# Criterion 3 - Research, Innovations and Extension

## 3.4 Extension Activities

### *3.4.2 Awards and recognitions received for extension activities from government / government recognized bodies*

Scanned with CamScanner

| 3.4.2 Number of awards and recognitions received for extension activities from government/ government recognized bodies during the year | | | |
|---|---|---|---|
| **Name of the activity** | **Name of the Award/ recognition** | **Name of the Awarding government/ government recognised bodies** | **Year of award** |
| NSS Camp | Vinzar Grampanchayat | Grampanchayat | 2023 |
| Health Awareness | Sanjivani Foundation | Maharashtra State | 2023 |
| Helping Hands | Asara Orphanage | Pune | 2022 |
| Food Donation | Rubicon Foundation | India | 2022 |
| Cyber Crime Awarene | Zeel Network Solution | Pune | 2023 |

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Rubicon

Scanned with CamScanner

वर्धमान बन्सीलाल रामनाथ आगरवाल चॅरिटेबल ट्रस्टचे,

# विश्वकर्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पुणे .

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग.

## विशेष हिवाळी शिबिर २०२२- २०२३अहवाल.

**दिनांक** : ०२ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०२३

**विषय** – स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व अंतर्गत

युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास **विशेष हिवाळी शिबिर २०२२- २०२३**

**स्थळ** – मु.पो. विंझर, ता - वेल्हे जि- पुणे.

**सदस्य** – प्रा.जय निकंबे, प्रा. रुपेश मंडलेचा.

**उपक्रमाची उद्दिष्ट्ये:**

- मतदान जागृती
- ग्राम स्वच्छता राष्ट्रीय एकात्मता • जल संवर्धन
- व्यक्तिमत्व विकास
- बालविवाह प्रतिबंध
- वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन पर्यावरण संवर्धन
- महिला सबलीकरण व सक्षमीकरण शिक्षण हक्क कायदा जनजागृती
- स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान युवक शक्तीतून ग्रामविकास
- शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास
- श्रमदान संस्कार
- सांस्कृतिक कार्यक्रम
- ग्रामसर्वेक्षण व ग्रामस्वच्छता गटचर्चा

**उपक्रमाचा प्रत्यक्ष आढावा:**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि विश्वकर्मा कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोंढवा, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर गुरुवार दिनांक ०२ फेब्रुवारी ते बुधवार दिनांक ०८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये मु.पो विंझर ता- वेल्हे जि- पुणे येथे आयोजित केले होते .

### दिनांक - १ फेब्रुवारी २०२३

विश्वकर्मा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील १० स्वयंसेवक निवासी शिबिरासाठीचे पूर्वनियोजन करण्यासाठी विंझर गावामध्ये पोहोचले. त्या स्वयंसेवकांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंझर येथील वर्गखोल्यांची स्वच्छता केली. शिबिरासाठी लागणारे सर्व साहित्य यांची जमवाजमव करून ठेवली. त्याचबरोबर पिण्याचे पाणी लाईटची व्यवस्था आदि सर्व कामांचे नियोजन केले.



Scanned with CamScanner

## दिनांक - २ फेब्रुवारी २०२३.

महाविद्यालयापासून सकाळी ठीक ६.३०० वाजता शिबिरासाठी निवड झालेले स्वयंसेवक विंझर गावाकडे मार्गस्थ झाले. ठीक आठ वाजता सर्व स्वयंसेवक विंझर गावामध्ये पोहोचले गावामध्ये पोहोचल्यानंतर प्रथमतः जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची बैठक घेण्यात आली. सर्व स्वयंसेवकांनी आपापली ओळख करून दिली. या सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. [illegible] यांनी विद्यार्थ्यांना या शिबिराचे उद्दिष्टे समजावून सांगितले व उर्वरित सात दिवसांचे नियोजन व आपला आराखडा विद्यार्थ्यांसमोर मांडला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास विशेष हिवाळी शिबिर उद्घाटन समारंभ कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंझर या ठिकाणी संपन्न झाला उद्घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समाज शिक्षण मंडळ विंझर चे अध्यक्ष मा श्री प्रदीप फडके त्याचबरोबर संतोष दसवडकर सरपंच सुनील भोसले उपसरपंच राहुल सागर माजी सरपंच संभाजी भोसले उपस्थित होते. प्रदीप फडके यांनी मार्गदर्शन केले व त्यांच्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत त्याबद्दल त्यांनी मांडणी केली कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व पाहुण्यांनी शिबिरार्थींना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचा शब्द दिला आणि शुभेच्छा व्यक्त केल्या सदर कार्यक्रमास विंझर ग्रामपंचायत सदस्य त्याचबरोबर सोसायटी चेअरमन व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. उद्घाटन समारंभ नंतर चहापान झाले व त्यानंतर विद्यार्थी शैक्षणिक उपक्रमासाठी गावांमध्ये गेले त्या ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले आणि संध्याकाळी बैठक झाली उद्याच्या कार्यक्रमाचे सर्व नियोजन झाले आणि जेवणानंतर पहिल्या दिवसाचा समारोप झाला.

## दिनांक - ३ फेब्रुवारी २०२३.

पहाटे पाच वाजता दिवसाची सुरुवात झाली सर्व विद्यार्थी मैदानावरती उपस्थित झाले. व्यायाम, योगासने करण्यात आली त्यानंतर प्रार्थना, ध्वजवंदन, राष्ट्रीय सेवा योजना गीत आदि उपक्रम राबविले गेले. अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी विंझर गावातील सिद्धार्थ नगर या भागामध्ये गेले. त्यानंतर गावातील सर्व मंदिरे स्वच्छ करण्यात आली रस्ते परिसर स्वच्छ करण्यात आला श्रमदान झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी हातातली तयारी केली बौद्धिक उपक्रमांतर्गत प्राध्यापक घनश्याम देवरे यांचे भाषा आणि कौशल्य विकास या विषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते प्राध्यापक घनश्याम देवरे यांनी भाषेचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करत असताना भाषा आणि कौशल्य विकास यांची सांगड कशी घालावी याच्यावरती महत्त्वपूर्ण असे भाष्य केले भाषेचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण असे असलेले महत्त्व त्यांनी त्यांच्या व्याख्यानात प्रकट केले. भाषा आणि व्यवसायातील संधी यावर देखील त्यांनी प्रकाश टाकला.

सायंकाळी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांतर्गत गावातील इंग्रजी विषयात आणि गणित विषयात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अध्यापन वर्ग सुरू केले. त्यानंतर बालविवाह जनजागृती बाबत कार्यक्रम सादर करण्यात आला विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा बालविवाह त्याचबरोबर इतर अनिष्ट रूढी परंपरा याबाबतीतील प्रबोधन करणारा कार्यक्रम गावातील भैरवनाथ मंदिराच्या समोर सादर केला.

## दिनांक - ४ फेब्रुवारी २०२३.

दिवसाची सुरुवात व्यायाम योगासने त्याचबरोबर प्रार्थना राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी गावचे प्रवेशद्वार धनगर वस्ती आणि अमृतेश्वर महाविद्यालय परिसर या ठिकाणी श्रमदान केले स्वयंसेवकाच्या काही गटांनी शोषखड्डे यांचे काम पूर्ण केले सर्व गटांनी श्रमदान केल्यानंतर आपल्या वैयक्तिक स्वच्छतेनंतर बौद्धिक उपक्रमांतर्गत मा महादेव गायकवाड यांचे मूल्यशिक्षण व युवक ताणतणाव व्यवस्थापन या विषयाच्या अनुषंगाने व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते मा गायकवाड यांनी तान तणावाचे व्यवस्थापन कशा प्रकारे करावे या विषयावरती महत्त्वपूर्ण अशी मांडणी केली युवकांच्या समोरील आव्हाने त्यांची भूमिका त्यांची जबाबदारी आणि मूल्यशिक्षण या तत्त्वांची सांगड त्यांनी त्यांच्या व्याख्यानाच्या माध्यमातून घातली. व्याख्यानादरम्यानच प्रश्नोत्तरांचा तास देखील घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातील शंका- कुशंका गायकवाड यांना विचारल्या सदर व्याख्यान मानसशास्त्राच्या आधारे त्यांनी घेतला आणि विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन केले. सायंकाळी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रम घेतले त्याचबरोबर महिलांसाठी वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्य या विषयावरती त्यांनी मार्गदर्शन केले उद्बोधन केले गावातील महिलांना उद्योग आणि रोजगार यातील संधी त्याचबरोबर स्वावलंबी होण्यासाठी कोणत्या प्रकारे प्रयत्न करावे यासाठी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. विविध शासकीय योजना इत्यादींची माहिती महिलांना दिली.

Scanned with CamScanner

**दिनांक - ५ फेब्रुवारी २०२३.**

दिवसाची सुरुवात व्यायाम योगासने त्याचबरोबर प्रार्थना राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी भुरूप वस्ती या ठिकाणी गेले होते भुरूप वस्तीतील सर्व परिसर विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला. सर खोदणे शोष खड्डे तयार करणे तसेच स्वच्छता मंदिर परिसर स्वच्छता इत्यादी कामे विद्यार्थ्यांनी केली त्यानंतर विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छता आणि जेवण झाल्यानंतर बौद्धिक उपक्रमाच्या अंतर्गत पत्रकार लक्ष्मण जाधव यांचे आदर्श आणि मूल्य समर्थन या विषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते आजच्या तरुण पुढे आदर्श कशाप्रकारचा असावा आणि मूल्य मानवी जीवनामध्ये किती महत्त्वाचे आहेत व्यक्तिमत्व विकासातील मूल्यांच्या आणि आदर्शांचे स्थान त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांसमोर मांडले विद्यार्थ्यांच्या जीवन जीवनाच्या जडणघडणीमध्ये मूल्यांचे आणि आदर्शांचे महत्त्व आपण नाकारू शकत नाही त्याशिवाय आपण आपल्या जीवनाची घडी व्यवस्थित बसू शकत नाही असे मत लक्ष्मण जाधव यांनी मांडले या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण भोसले यांची उपस्थिती होती या उपक्रमानंतर विद्यार्थ्यांचे बौद्धिक खेळ घेण्यात आले सायंकाळी शैक्षणिक उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी गावातील गणित इंग्रजी विषयात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष वर्ग घेतले त्याच बरोबर गावातील विद्यार्थ्यांना एकत्र करून हनुमान मंदिर भैरवनाथ मंदिर या ठिकाणी दोन गट करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी बाबींविषयी मार्गदर्शन केले.

**दिनांक - ६ फेब्रुवारी २०२३.**

दिवसाची सुरुवात व्यायाम, योगासने त्याचबरोबर प्रार्थना, राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली. अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी भोसले वस्ती येथे गेले. त्या ठिकाणी परिसर स्वच्छता चर खोदणे शोषखड्डे खोदणे इत्यादी कामे केले. व एक स्वच्छता जीवन त्यानंतर बौद्धिक उपक्रमांतर्गत प्राध्यापक किरण गाढवे यांचे युवा शक्ती या विषयावरती विशेष व्याख्या आयोजित केलेले होते भारत देशाच्या जडणघडणी मधील युवकांचे योगदान कशा प्रकारचे असावे युवकांचे ध्येय धोरणे आणि उद्दिष्टे काय असावीत युवकाने कोणत्या प्रकारचा मार्ग स्वीकारला पाहिजे अशा अनेक विषयाच्या अनुषंगाने युवकांना त्यांच्यामधील असलेल्या शक्तीचे दर्शन प्रा. गाढवे यांनी घडविले युवकांमध्ये असणाऱ्या ऊर्जेचे शक्तीचे स्थान त्यांनी विद्यार्थ्यांना दाखवून दिले विद्यार्थ्यांमध्ये युवकांमध्ये असलेल्या नवनिर्मितीचे कौशल्य त्यांनी सोदाहरण विद्यार्थ्यांना पटवून दिले युवक कशाप्रकारे या देशाचा चेहरा मोहरा बदलू शकतो हे त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांसमोर सादर केले. सायंकाळी विद्यार्थ्यांसाठी काही बौद्धिक उपक्रम राबवले होते त्याचबरोबर मुलींसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. गावातील विद्यार्थ्यांना विशेषता जे पहिले ते नववीपर्यंतचे विद्यार्थी आहेत त्यांना गणित आणि इंग्रजी या विषयाचे विशेष मार्गदर्शन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी उद्बोधन सत्रे घेतली. त्यानंतर गावामध्ये प्रबोधन करण्यासाठी म्हणून प्रबोधन दिंडी काढण्यात आली या दिंडीमध्ये सर्व प्रकारच्या सरकारी योजना बालविवाह आपले हक्क आणि कर्तव्य आधी विषयाचे बॅनर घेऊन गावातील वारकरी संप्रदायाला एकत्रित करून त्याचबरोबर सर्व गावाला समाविष्ट करून ही दिंडी जिल्हा परिषद शाळा विंजर ते संपूर्ण गावांमधून फिरविण्यात आली दिंडीच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवकांनी केले. या पालखी दिंडी सोहळ्यानंतर समस्त गावकरी व स्वयंसेवक यांच्यासाठी ह. भ. प अक्षय महाराज लिम्हण यांचे कीर्तन आयोजित करण्यात आलेले होते. कीर्तनाच्या माध्यमातून लिमन यांनी व्यसनमुक्ती या विषयावरती विशेष मार्गदर्शन केले देशाच्या गावाच्या विकासासाठी व्यसनांना कशाप्रकारे मोठे माती देऊन आपण प्रगती करू शकतो यावरती विशेषता भर त्यांनी दिला.

**दिनांक - ७ फेब्रुवारी २०२३.**

दिवसाची सुरुवात व्यायाम, योगासने त्याचबरोबर प्रार्थना, राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली. अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी गावात येथे गेले. त्या ठिकाणी परिसर स्वच्छता चर खोदणे, शोषखड्डे खोदणे इत्यादी कामे केले. वैयक्तिक स्वच्छता आणि भोजन नंतर बौद्धिक उपक्रमांतर्गत प्रशांत गडदे यांचे प्रथम उपचार या विषयावरती व्याख्यान आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आलेली होती प्रशांत गडदे सर यांनी विद्यार्थ्यांना कुठलीही समस्या आल्यानंतर त्याच्यावरती कशाप्रकारे मदत करायची आणि प्रथमोपचार कशाबद्दल करायचा याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. त्या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक लक्ष्मण भोसले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सायंकाळी शैक्षणिक उपक्रम अंतर्गत गावातील पहिली ते नववी पर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात

Scanned with CamScanner

दिनांक - ७ फेब्रुवारी २०२३.

दिवसाची सुरुवात व्यायाम, योगासने त्याचबरोबर प्रार्थना, राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली. अल्पोपहारानंतर विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी गावात गेले गेले. त्या ठिकाणी परिसर स्वच्छता चर खोदणे, शोषखड्डे खोदणे इत्यादी कामे केले. वैयक्तिक स्वच्छता आणि भोजन नंतर बौद्धिक उपक्रमांतर्गत प्रशांत गडदे यांचे प्रथम उपचार या विषयावरती व्याख्यान आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आलेली होती प्रशांत गडदे सर यांनी विद्यार्थ्यांना कुठलीही समस्या आल्यानंतर त्याच्यावरती कशाप्रकारे मदत करायची आणि [illegible] याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. त्या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक लक्ष्मण भोसले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सायंकाळी शैक्षणिक उपक्रम अंतर्गत गावातील पहिली ते नववी पर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले त्यानंतर गावामध्ये रोजगार आणि नवीन संधी याच्या विषयी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांचे समुपदेशन . सायंकाळी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रम राबविले गणित आणि इंग्रजी विषयातील मागे असलेल्या विद्यार्थ्यांनी विशेष वर्ग घेतले गावातील भैरवनाथ मंदिराच्या प्रांगणामध्ये महिला आरोग्य आणि स्वच्छता याविषयी मुलींनी गावातील महिलांना मार्गदर्शन केले. भोजनानंतर विद्यार्थ्यांची बैठक झाली आणि दिवसाचा समारोप करण्यात आला.

दिनांक - ८ फेब्रुवारी २०२३.

दिवसाची सुरुवात व्यायाम, योगासने त्याचबरोबर प्रार्थना, राष्ट्रीय सेवा योजना गीत इत्यादी उपक्रमातून झाली. विद्यार्थ्यांसाठी ट्रेकिंगचे आयोजन करण्यात आलेले होते बिंझरगाव ते पुणे खिंड असा ट्रेकिंगचा मार्ग होता सर्व स्वयंसेवकांनी उत्तम प्रकारे हा ट्रेक पूर्ण केला. नंतर विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता व भोजन यानंतर केले.बौद्धिक उपक्रम या अंतर्गत ओमकार जोशी यांचे 'वाद्य संस्कृती' या विषयावरती व्याख्यान झाले.

समारोपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते समारोपाच्या कार्यक्रमासाठी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते बिंझर गावचे उपसरपंच श्री राहुल सागर यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष दान स्वीकारले विश्वकर्मा कलावधी विज्ञान महाविद्यालय कोंढवा पुणे महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी या समारोपाच्या कार्यक्रमांमध्ये मनोगत व्यक्त केली त्याचबरोबर गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य गावातील प्रतिष्ठित नागरिक पदाधिकारी यांनी देखील आपापली मते व्यक्त केली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी जय निकंबे यांनी सर्व गावकऱ्यांची या ठिकाणी आभार मानले

प्रा.जय निकंबे

( राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी )

Dr. Arun R. Patil
PRINCIPAL
Vishwakarma College of Arts
Commerce & Science
Kondhwa (Bk), Pune - 411 046.

डॉ.अरुण पाटील

( प्राचार्य )



Scanned with CamScanner

National Service Scheme

## उदघाटन समारंभ

गुरुवार दिनांक ०२/०२/२०२३ रोजी २.०० वाजता.

### *प्रमुख पाहुणे*

मा. श्री.संतोष(आप्पा) दसवडकर — मा. श्री.प्रदीप फडके (अध्यक्ष ,समाज शिक्षण मंडळ विंझर )

मा. श्री.सुनील भोसले (सरपंच)

मा. श्री. राहुल सागर (उपसरपंच) — मा. श्री. संभाजी भोसले (मा. सरपंच,विंझर)

### *सन्माननीय उपस्थिती*

विंझर ग्रामपंचायत सदस्य

मा. श्री. विनायक लिम्हण — मा. सविता दसवडकर

मा. मोहिनी सतिश लिम्हण — दत्ताराम भुरूक

मा. उषा भोसले — मा. शकुंतला कारके — मा. नूतन गायकवाड

मा. श्री. सुभाषशेठ भोसले - चेअरमन वि.सो.विंझर

मा. श्री. सचिन भोसले - अध्यक्ष तं. मु. ग्रा. प. विंझर

डॉ. नितीन भालेराव - ग्रामसेवक — राजपाल यादव (तलाठी)

मा. श्री. सचिन गायकवाड (पो. पाटील ग्रा. पं. विंझर)

## -: समारोप :-

बुधवार दिनांक ०८/०२/२०२३ रोजी २.०० वाजता

### *प्रमुख पाहुणे*

**मा. श्री. डॉ. अरुण पाटील – प्राचार्य**

विश्वकर्मा कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मा. श्री. डॉ.संजीव लाठे - प्राचार्य

अनुलेखर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मा. श्री. मधुकर पोबार - (प्राचार्य न्यू इंग्लिश स्कूल विंझर

मा. श्री. संतोष लिम्हण – संचालक समाज शिक्षण मंडळ

मा. श्री. सुरेश ससे (प्रबंधक) — मा. श्री..संतोष कारेकर (वित्त व लेखा अधिकारी)

मा. श्री. किरण भोसले – ग्रामस्थ — मा. श्री. लक्ष्मण भोसले – ग्रामस्थ

## *व्याख्यानमाला*

| वार/ दिनांक | व्याख्याते | विषय |
|---|---|---|
| गुरुवार २ फेब्रुवारी | प्रदीप फडके | उद्घाटन |
| शुक्रवार ३ फेब्रुवारी | प्रा. घनशाम देवरे | भाषा आणि कौशल्य विकास |
| | | व्यक्तिमत्व विकासातील खेळाचे महत्त्व |
| शनिवार ४ फेब्रुवारी | अशोक नांगरे | मूल्यशिक्षण व युवक ताणतणाव व्यवस्थापन |
| | रवींद्र जोशी | आदर्श आणि मूल्यसंवर्धन |
| रविवार ५ फेब्रुवारी | लक्ष्मण जाधव | युवाशक्ती |
| सोमवार ६ फेब्रुवारी | प्रा. किरण गाढवे | प्रथमोपचार |
| मंगळवार ७ फेब्रुवारी | प्रशांत गडदे | वाद्यसंस्कृती |
| बुधवार ८ फेब्रुवारी | ओमकार जोशी | |

## -: सदिच्छा भेट :-

मा. डॉ. कारभारी काळे (कुलगुरू, सा.फु.पु.वि)

मा. डॉ.संजीव सोनवणे (प्र.कुलगुरू, सा.फु.पु.वि)

मा. डी. कार्तिगेन

(क्षेत्रिय संचालक ए रा. से. यो. क्षेत्रिय संचालनालय भारत सरकार)

मा. डॉ प्रभाकर देसाई (संचालक रा. से. यो. सा. फु. पु. वि.)

मा. सी. एम. ए. चारुशीला गायके

(वित्त व लेखा अधिकारी सा. फु. पु. विद्यापीठ, पुणे)

मा. डॉ. नाना शेजवळ ( नोडल ऑफिसर )

मा. शिवाजीराव पाचारणे ( जि. समन्वयक, पु.ग्रा., रा.से.यो. पुणे वि.)

मा. विजय बनकर (शिक्षण विभाग)

## -: स्वागतोत्सुक :-

डॉ. अरुण पाटील- प्राचार्य

प्रा. अंजुम पटेल – उप प्राचार्या

प्रा.डॉ. सुधीर चिटणीस - विज्ञान विभागप्रमुख

प्रा.डॉ शीतल मंत्री- वाणिज्य विभागप्रमुख

प्रा.जय विश्वास निकंबे- (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी)

*सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजना विश्वकर्मा कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय कोंढवा पुणे*

*सर्व प्राध्यापक व कर्मचारी , समस्त ग्रामस्थ विंझर ग्रामपंचायत*

Scanned with CamScanner

## *शिबिराचे उद्दिष्टे*

- मतदान जागृती • व्यक्तिमत्व विकास • बालविवाह प्रतिबंध
- ग्राम स्वच्छता राष्ट्रीय एकात्मता • जल संवर्धन
- शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास • श्रमदान संस्कार
- सांस्कृतिक कार्यक्रम • वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन पर्यावरण संवर्धन
- ग्रामसर्वेक्षण व ग्रामस्वच्छता गटचर्चा
- महिला सबलीकरण व सक्षमीकरण शिक्षण हक्क कायदा जनजागृती
- स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान युवक शक्तीतून ग्रामविकास

## *शिबिर काळातील दिनक्रम*

### सकाळी ते सायंकाळी दिनक्रम

| | |
|---|---|
| ५.३० ते ६.१५ | प्रार्थना, ध्वजवंदन, रासेयो गीत |
| ६.१५ ते ७.३० | व्यायाम, योगासने |
| ७.३० ते ८.०० | अल्पोपहार |
| ८.०० ते १२.३० | श्रमदान |
| १२.३० ते १.०० | अंघोळ व तयारी |
| १.०० ते २.०० | भोजन |
| २.०० ते ३.०० | बौध्दिक उपक्रम |
| ३.०० ते ६.०० | शिवार फेरी, ग्रामसर्वेक्षण व समाज प्रबोधन |
| ६.०० ते ७.०० | शैक्षणिक उपक्रम |
| ७.०० ते ८.३० | भोजन |
| ८.३० ते १०.०० | कार्यक्रम अधिकारी मनोगत |

:: संयोजक :–
डॉ अरुण रामचंद्र पाटील – प्राचार्य,
विश्वकर्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

संपर्क – प्रा.जय विश्वास निकंबे
(राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) ९६६५९२१५६२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना

बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्टचे,

# विश्वकर्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

सर्वे नं. ३/४, लक्ष्मिनगर, कोंढवा (बु.), पुणे-४११०४८

नॅक मूल्यांकन B + दर्जा प्राप्त.

आज़ादी का अमृत महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व अंतर्गत
युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास

## विशेष हिवाळी शिबिर २०२२-२०२३

## सस्नेह निमंत्रण व कार्यक्रम पत्रिका

(०२ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०२३)

*** शिबिर स्थळ ***
मु.पो. विंझर, ता - वेल्हे जि- पुणे.

स.न.वि.वि.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि विश्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोंढवा, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शि हिवाळी श्रमसंस्कार शिबिर गुरुवार दिनांक ०२ फेब्रुवारी ते बुधवार दिनांक फेब्रुवारी या कालावधीमध्ये मु.पो विंझर ता- वेल्हे जि- पुणे येथे आयोजित केले या शिबिरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून सर्व शिबिरार्थींना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

## National Service Scheme

### List Of Selected Students For Special NSS Camp

| Sr No. | Eligibility No. | Student Name | Category | Course Name | Gender | Current Acadamic Year | Nss Year |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 12021061440 | SANGHVI SAHIL KETAN | OPEN | B.B.A. | MALE | II | 1 |
| 2 | 12021061574 | SIDDHANT SAROJ JHA . . | OPEN | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 3 | 12021174866 | SHINDE ISHITA JITENDRA | OPEN | B.B.A.(Computer Application) | FEMALE | II | 1 |
| 4 | 12020034153 | BODUL MOHIT PURUSHOTTAM | SBC | B.Com. | MALE | III | 2 |
| 5 | 12020034268 | PAWAR VISHAL PRADEEP | OPEN | B.Com. | MALE | III | 2 |
| 6 | 12021062644 | SHINDE SNEHA BADRINATH | OPEN | B.B.A.(Computer Application) | FEMALE | II | 1 |
| 7 | 12021174877 | ANKIT SIKARWAR . . | OPEN | B.Com. | MALE | II | 1 |
| 8 | 12021061610 | MARLECHA AKANKSHA SACHIN | OPEN | B.B.A.( International Business) | FEMALE | II | 1 |
| 9 | 12021061550 | SHAH DARSHANA RUPESH | OPEN | B.B.A.( International Business) | FEMALE | II | 1 |
| 10 | 12020034314 | GUJAR KUNAL MILIND | OPEN | B.Com. | MALE | III | 2 |
| 11 | 12021136779 | KAKADE OMKAR KESHAV | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 12 | 12021061603 | MEHTA PARAM MALAY | OPEN | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 13 | 12021061792 | SUKALE VISHAL CHANDU | NT(B) | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 14 | 12021061664 | GANDHI YOGEN NILESH | OPEN | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 15 | 12021061777 | NIDAGUNDI NIHAL SHAKEEL | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 16 | 12020034107 | VANVE APEKSHA KUMAR | NT(D) | B.Sc. Computer Science | FEMALE | III | 2 |
| 17 | 12020034108 | NEWASE HARSHAL CHANDRAKANT | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | I | 2 |
| 18 | 12020034117 | PAWAR SHUBHAM RAJU | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 19 | 12020034226 | GUJAR KARAN MANOJ | OPEN | B.Com. | MALE | III | 2 |
| 20 | 12021062007 | PUNEKAR VAISHNAVI BALASAHEB | OPEN | B.Com. | MALE | II | 1 |
| 21 | 12020108954 | VINEET SUNIL ZAROO . . | OPEN | B.Com. | MALE | III | 1 |

3/14/2023 9:27:12 AM





Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | 12021061651 | MADHURAJ MANOJ DWIVEDI | OPEN | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 23 | 12021061574 | DESHMUKH ABHISHEK PRAMOD | OPEN | B.B.A.(Computer Application) | MALE | II | 1 |
| 24 | 12021062018 | NADGERI DIKSHA RAMESH | SC | B.Com. | FEMALE | II | 1 |
| 25 | 12021136771 | FAEKA IMTIYAZ ANSARI | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 26 | 12020222807 | PARDESHI AAYUSH SANJAY | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 27 | 12020118919 | NIGADE ISHA SUJIT | OPEN | B.Sc. Computer Science | FEMALE | III | 2 |
| 28 | 12020108922 | MENKAR ATHARV DIPAK | OBC | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 29 | 12021190372 | KOLEKAR MADHURI DATTA | NT(C) | B.Sc. Computer Science | FEMALE | II | 1 |
| 30 | 12021061796 | MULE RAMESHWARI GANESH | OBC | B.Sc. Computer Science | FEMALE | II | 1 |
| 31 | 12020108926 | DUBEY JEET RAJESH | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 32 | 12020034152 | PAWAR ABHISHEK BABURAO | OPEN | B.Com. | MALE | III | 2 |
| 33 | 12020150167 | GANBOTE PRATHAMESH RAKESH | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 34 | 12021179313 | MATKAR VISHAL KUSHINATH | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 35 | 12021061818 | KOSHATWAR SURABHI GAJANAN | OPEN | B.Sc. Computer Science | FEMALE | II | 1 |
| 36 | 12021062067 | SHUKLA ALOK ARUN | OPEN | B.Com. | MALE | II | 1 |
| 37 | 12020034140 | VARMA JYOTI RAMDEV | OPEN | B.Sc. Computer Science | FEMALE | III | 2 |
| 38 | 12021061554 | SONAWANE AVISHKAR KAILAS | OBC | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 39 | 12021061556 | NAHAR SANJOG ATUL | OPEN | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |
| 40 | 12022019663 | MEDHEKAR OM DILIP | OPEN | B.B.A. | MALE | I | 1 |
| 41 | 12020034131 | DHANGE NAMRATA MAHANTESH | OPEN | B.Sc. Computer Science | FEMALE | III | 2 |
| 42 | 12020034120 | NIRMAL VISHAKHA VIJAY | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| 43 | 12020154229 | JADHAV OMKAR RANJEET | OPEN | B.B.A.(Computer Application) | MALE | III | 2 |
| 44 | 12021061525 | GAIKWAD TANAYA MAHADEV | OPEN | B.B.A. | FEMALE | II | 1 |
| 45 | 12021061849 | PATIL SUJIT MAHADEV | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | II | 1 |
| 46 | 12021061989 | SOKANDE ANKITA ANANT | OPEN | B.Com. | FEMALE | II | 1 |

3/14/2023 9:27:12 AM



Scanned with CamScanner

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY


## National Service Scheme

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | GHUGE RUTUJA SHAHADEV | NT(D) | B.Sc. Computer Science | FEMALE | III | 2 |
| [illegible] | [illegible] | TRIPATHI RISHABH AKHILESH | OPEN | B.B.A. | MALE | II | 1 |
| [illegible] | [illegible] | POTHIWAL GURMAIL SINGH RANVIR SINGH | OPEN | B.Sc. Computer Science | MALE | III | 2 |
| [illegible] | [illegible] | SAWARKAR SHANTANU DILIP | OBC | B.B.A.( International Business) | MALE | II | 1 |

3/14/2023 9:27:12 AM

Scanned with CamScanner











Scanned with CamScanner









Scanned with CamScanner






Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner